।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

परिपत्रक क्र. ७७ /१९९२.

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार सर्व संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळविण्यांत येते की,

मराठी विषयाच्या संदर्भात विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाने घेतलेले पुढील निर्णय व माहिती मराठी विषयाचे प्राध्यापक व संबंधितांना कळवावी ही विनंती.

१] प्रथम वर्ष वाणिज्य वर्गासाठी संपादित करण्यात आलेल्या "वाङ्मयीन मराठी" या पाठ्यपुस्तकात संपादक मंडळाची नावे अनवधानाने छापावयाची राहून गेली आहेत. हे पुस्तक पुढील प्राध्यापकांनी संपादित केले आहे.

१] डॉ. र. ना. वरखेडे.
२] प्रा. अनिल लोनार.
३] प्रा. जवाहर जैन.
४] प्रा. शशिकला कोल्हे.

कृपया सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

२] प्रथम वर्ष कला या वर्गासाठी यापूर्वी विद्यापीठाने स्वतंत्र परिपत्रकान्वये तपशीलवार अभ्यासक्रम कळविलेला आहे. अभ्यासक्रमांच्या संदर्भात पुढील निर्णय घेण्यात आला आहे.

अ] "काव्यरत्नावली" हे पाठ्यपुस्तक परिपत्रक क्र. ७२/१९९२/१०. ८. ९२ नुसार ५० गुणांसाठी ठेवण्यात आले होते. त्या ऐवजी हे पाठ्यपुस्तक ६० गुणांसाठी ठेवण्यात येत आहे. तसेच "कथामाला" हे पाठ्यपुस्तक ५० गुणाऐवजी ४० गुणांसाठी ठेवण्यात येत आहे. या बदलामुळे अध्यापनाची विभागणी, तसेच गुण विभागणी यांचे सुधारित तपशील पुढील प्रमाणे असतील. –

१] प्रथम सत्र :– काव्य रत्नावली – घटक १ ते घटक १३ [कवितेचे अध्ययन दिशा पासून "गीत काव्य" अखेर कोणतीही कविता न वगळता]
२] प्रथम सत्रांत परीक्षेत उपरोक्त अध्ययन घटकांवर [क्र. १ ते १३] प्रश्नपत्रिका ६० गुणांची असेल.
३] द्वितीयसत्रांत – "कथामाला" या पाठ्यपुस्तकातील फक्त पुढील घटक शिकवावयाचे आहेत.

३.१ : कथा : स्वरूप – अध्ययनाच्या दिशा
३.२ : लोककथा : "मोतीपवळ्याची गोष्ट"
३.३ : दृष्टान्त कथा : आधारियेचा परिसाचा दृष्टांत
३.४ : स्फुट गोष्ट : उपकारांची उत्तम फेड [ह. ना. आपटे]
३.५ : लघुकथा : अंगणातील पोपट [दिवाकर कृष्ण]
३.६ : नवकथा : किडलेली माणसे [गंगाधर गाडगीळ]
३.७ : रूपककथा : मत्स्यगंधा [जी. ए. कुळकर्णी]
३.८ : ग्रामीण कथा : दावं [चारुता सागर]
३.९ : दलित कथा : जेव्हा मी जात चोरली [बाबुराव बागुल]
३.१०: विज्ञान कथा : होते कुरूप वेडे [निरंजन घाटे]

या अभ्यासक्रमास ४० गुण असतील.

...२

प्रश्नपत्रिकेचे स्वरूप यापूर्वी परिपत्रक क्र. ७२/१०.८.१९९२ अन्वये कळविल्या प्रमाणेच असेल. फक्त गुण विभागणीत बदल करणेत आला आहे. [काव्य रत्नावली- ६० गुण, पैकी पहिल्या सत्रातील परीक्षेचे ६० पैकी २० गुणात समांतर व वार्षिक परीक्षेत ४० गुणाचे प्रश्न आणि कथामाला वार्षिक परीक्षेत ४० गुणाचे प्रश्न]

३] प्रथम वर्ष कला वर्गासाठी उपयोजित मराठीच्या अभ्यासक्रमात पत्रलेखन व व रोजनिशी या घटकांसाठी नेमण्यात आलेले उतारे उ. म. वि. पुस्तक रूपाने उपलब्ध करून देत आहे. त्यासाठी संबंधित महाविद्यालयांनी मागणी विद्यापीठाकडे नोंदवावी. तसेच द्वितीय सत्रासाठी कुठलेही विशिष्ट पाठ्य-पुस्तक तयार करण्यात येणार नाही. जाहिरात [घटक ४८] व मुलाखत [घटक क्र. ४३] या घटकांचे अध्यापन शिक्षकांनी नमुना उताऱ्यांच्या आधारे करावे. त्यासाठी स्वतंत्रपणे विशिष्ट उतारे नेमण्यात आलेले नाहीत.

४] एम. ए. भाग-२ , समीक्षा विचार आणि साहित्य समीक्षा :

[प्रश्नपत्रिका क्र. ८]

दुसऱ्या सहामाहीसाठी पुणे विद्यापीठाने १९९१-९२ साठी नियुक्त केलेला अभ्यासक्रम कायम ठेवण्यात आला आहे. त्यानुसार

क] चरित्रात्मक समीक्षा पध्दतीसाठी [१] काळेपाणी [वि. दा. सावरकर]

२] सुधारक [माधव ज्युलियन]

ख] मानसशास्त्रीय समीक्षापध्दती साठी - [१] गुणारिणीचे लावण्य [दिवाकर कृष्ण]

२] सतराचे वर्ष [पु. भा. भावे]

३] शांतता कोर्ट चालू आहे. [विजय तेंडुलकर]

ही पुस्तके उपयोजनासाठी कायम ठेवण्यात आली आहेत.

जा. क्र. अभ्यासक्रम/९२/६/२६/८८७३

दिनांक : १. ९. १९९२.

जळगांव.

सहा. कुलसचिव.

प्रत माहितीसाठी सादर रवाना:-

१] मा. अधिष्ठाता, कला विद्याशाखा.
२] मा. सदस्य, मराठी अभ्यास मंडळ.
३] सर्व संलग्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे मा. प्राचार्य.
४] मा. कुलसचिव, उ. म. वि. जळगांव.
५] मा. सहा. कुलसचिव, परीक्षा विभाग, उ. म. वि. जळगांव.
६] मा. कक्षाधिकारी, रेकॉर्ड विभाग, उ. म. वि. जळगांव.

डी./